***The Research Analytics*** **ISSN (Online): 3107-6165**
**Volume 3, Special Issue 1, Jan 2026**

***The Research Analytics***
**(A Peer Reviewed and Open Access Journal)**

**21**

# पश्चिम खानदेशातील सार्वजनिक ग्रंथालयासमोरील २१ व्या शतकातील आव्हाने व संधी

प्राचार्य प्रा. डॉ. पी. एस. सोनावणे [1] दुर्गेश मोतीलाल खैरनार[2]

1) (संशोधक मार्गदर्शक) क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव
2) (संशोधक विद्यार्थी) क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव

Pages No: 157-161

***सारांश*** *- पश्चिम खानदेशातील सार्वजनिक ग्रंथालये ग्रामीण व शहरी भागातील ज्ञानवितरणाचे महत्वपूर्ण केंद्र राहिले आहेत. तथापि, २१ वे शतक हे डिजिटायझेशन, ई-ग्रहण, वाचकांची बदलती आवड, तांत्रिक प्रगती आणि प्रशासनिक आव्हाने यांनी ग्रंथालय सेवांसमोर नवे प्रश्न उभे करते. या संशोधनात परिसरातील ग्रंथालयांची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा, तांत्रिक अंमलबजावणी, वाचकसंख्या, कर्मचारी कौशल्य तसेच भविष्यातील संधींचा अभ्यास केला आहे. निष्कर्षांवरून असे दिसून येते की योग्य धोरणात्मक योजना, आर्थिक सहाय्य, डिजिटल संसाधनांची उपलब्धता आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यांच्या साहाय्याने सार्वजनिक ग्रंथालये पुन्हा ज्ञानकेंद्र म्हणून उदयास येऊ शकतात.*

***शोध संज्ञा*** *- सार्वजनिक ग्रंथालय, पश्चिम खानदेश, २१ व्या शतकातील आव्हाने, डिजिटल ग्रंथालय सेवा, माहिती तंत्रज्ञान*

**प्रस्तावना -** पश्चिम खानदेश क्षेत्रात (धुळे, नंदुरबार) सार्वजनिक ग्रंथालयांना सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण स्थान आहे. ऐतिहासिकदृष्ट्या या ग्रंथालयांनी समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी ज्ञानाचे दरवाजे खुले ठेवले.२१ व्या शतकात तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या प्रगतीमुळे माहिती मिळवण्याची साधने बदलली आहेत. मोबाईल इंटरनेट, ई-पुस्तके, सामाजिक माध्यमे आणि डिजिटल डेटाबेस उपलब्ध होत असताना पारंपरिक ग्रंथालये या स्पर्धेत कशी टिकतील हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पश्चिम खानदेशातील ग्रंथालयांची सद्यस्थिती, आव्हाने आणि उपलब्ध संधी यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**संशोधन उद्दिष्टे** -

१. पश्चिम खानदेशातील सार्वजनिक ग्रंथालयांची सध्याची स्थिती सर्वांगाने अभ्यासणे.
२. २१ व्या शतकात ग्रंथालयांना भेडसावणाऱ्या प्रमुख आव्हानांची ओळख करून घेणे.
३. डिजिटल युगात ग्रंथालयांसाठी उपलब्ध असलेल्या नव्या संधींचे विश्लेषण करणे.
४. ग्रंथालय सेवांच्या दर्जात वाढ करण्यासाठी उपयुक्त शिफारसी सुचवणे.

**गृहितके** -

१. २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या अभावामुळे सार्वजनिक ग्रंथालयांची कार्यक्षमता प्रभावित होते.
२. वाचकांच्या आवडीनिवडीतील बदलामुळे पारंपरिक ग्रंथालयातील वाचकसंख्या घटते.

३. योग्य निधी, मनुष्यबळ आणि डिजिटल साधने उपलब्ध झाल्यास सार्वजनिक ग्रंथालये अधिक प्रभावीपणे कार्य करू शकतात.
४. डिजिटल स्रोतांचा समावेश केल्यास ग्रामीण व शहरी भागातील वापरकर्त्यांची संख्या लक्षणीय वाढू शकते.

**विषय विवेचन**-

**(अ) पश्चिम खानदेशातील सार्वजनिक ग्रंथालयांची सद्यस्थिती**

पश्चिम खानदेशातील अनेक ग्रंथालये ऐतिहासिक वारसा लाभलेली असली तरी त्यांच्याकडे आधुनिक पायाभूत सुविधांची कमतरता आहे. काही ग्रंथालयांकडे प्रशस्त इमारत असूनही त्यात डिजिटल लायब्ररी, इंटरनेट सुविधा किंवा संगणकांची उपलब्धता मर्यादित आहे. वाचनालयातील निधी अपुरा असल्याने पुस्तके अद्ययावत करण्यास अडचणी येतात.

**(ब) २१ व्या शतकातील प्रमुख आव्हाने**

**१. डिजिटायझेशनचा अभाव**- २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत असताना अनेक सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये अद्याप पूर्णपणे डिजिटायझेशन झालेले नाही, ही एक गंभीर अडचण ठरते. पुस्तकांचे डिजिटल कॅटलॉगिंग, ई-संसाधनांची उपलब्धता, डिजिटल आर्काइव्ह, स्कॅन केलेले दस्तऐवज आणि ऑनलाइन सेवांचा अभाव असल्याने वाचकांना आधुनिक सुविधा मिळत नाहीत. माहिती शोधण्यासाठी वाचकांना अजूनही पारंपरिक पद्धतींवर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे वेळखर्च आणि कार्यक्षमता दोन्ही घटतात. ग्रामीण व अर्धनगरी भागातील ग्रंथालयांमध्ये संगणक, इंटरनेट, सॉफ्टवेअर व प्रशिक्षित कर्मचारी नसल्यामुळे डिजिटायझेशनची प्रक्रिया अधिकच मर्यादित राहते. परिणामी ग्रंथालये जागतिक ज्ञानसंपत्तीशी जोडली जात नाहीत आणि तंत्रज्ञानाधारित नव्या पिढीच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरतात. ही पोकळी भरून काढण्यासाठी नियोजित गुंतवणूक आणि तांत्रिक क्षमता विकसित करणे अत्यावश्यक आहे.

**२. वाचन संस्कृतीतील घट:** सध्या समाजात वाचनसंस्कृती हळूहळू कमी होत आहे, हे एक गंभीर आव्हान आहे. युवा पिढी पुस्तके वाचण्याऐवजी मोबाइल, सोशल मीडिया, व्हिडिओ प्लॅटफॉर्म्स आणि गेम्सकडे जास्त लक्ष देते. परिणामी ग्रंथालयांतील प्रत्यक्ष वाचनसंख्या कमी होत आहे, पुस्तके आणि संशोधन साहित्य यांचा वापर मर्यादित राहतो. ग्रामीण आणि अल्पसुविधा असलेल्या भागांमध्ये ही परिस्थिती अधिक गंभीर आहे कारण तिथे डिजिटल साधने व ई-संसाधने कमी उपलब्ध आहेत. वाचनसंस्कृतीतील घट केवळ ज्ञान मिळवण्यावर परिणाम करत नाही, तर विचारविनिमय, सृजनशीलता आणि विश्लेषणात्मक क्षमता यावरही विपरीत परिणाम करतो. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांना वाचकांशी पुन्हा जोडण्यासाठी आणि समाजात वाचनाची सवय वाढवण्यासाठी नव्या उपक्रमांची आवश्यकता भासते.

**३. मर्यादित वित्तीय संसाधने:** सार्वजनिक ग्रंथालयांच्या कार्यक्षमतेवर आणि विकासावर मर्यादित वित्तीय संसाधने मोठा परिणाम टाकतात. अनेक ग्रंथालयांकडे पुस्तके खरेदी करणे, नवीन डिजिटल साधने उपलब्ध करणे, संगणक व इंटरनेट सुविधा सुरू ठेवणे किंवा इमारतीच्या देखभालीसाठी पुरेशी निधी उपलब्ध नसतो. परिणामी ग्रंथालयांची सेवा मर्यादित राहते, नवीन कार्यक्रम राबवणे कठीण होते आणि कर्मचारी वेतन व प्रशिक्षणावर खर्च करण्याची क्षमता कमी होते. शासनाकडून मिळालेले अनुदान हे अपुरे व अनियमित स्वरूपाचे असते. ग्रामीण व अल्पविकसित भागातील ग्रंथालये या निधीच्या कमतरतेमुळे आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारू शकत नाहीत. वित्तीय मर्यादेमुळे ग्रंथालयाची प्रभावी कामगिरी, वाचकांपर्यंत पोहोच आणि ज्ञानवितरण क्षमता कमी होते. त्यामुळे ग्रंथालयांचा विकास आणि समाजाशी संवाद यासाठी अतिरिक्त वित्तीय योजना आणि सार्वजनिक–खाजगी सहकार्य आवश्यक ठरते.

**४. तांत्रिक क्षमता आणि प्रशिक्षणाचा अभाव:** पश्चिम खानदेशातील सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर अनेक वेळा मर्यादित राहतो, कारण कर्मचारी व व्यवस्थापन यांना तांत्रिक कौशल्य आणि आवश्यक प्रशिक्षण उपलब्ध नाही. दूरवरच्या खेड्यांमधील आणि आदिवासीबहुल भागातील ग्रंथालयांमध्ये संगणक, इंटरनेट, ई-पुस्तके, डिजिटल कॅटलॉग (OPAC) किंवा RFID प्रणालीसारख्या साधनांचा वापर करण्यासाठी कर्मचारी सक्षम नसतात. प्रशिक्षणाचा अभाव असल्यामुळे उपलब्ध तांत्रिक साधने पूर्ण क्षमतेने वापरली जात नाहीत आणि डिजिटल ग्रंथालय सेवा, ऑनलाईन डेटाबेस, ई-संशोधन साहित्य यांचा फायदा वाचकांना मिळत नाही. परिणामी ग्रंथालयातील सेवा आधुनिक अपेक्षांनुसार कार्यक्षम होत नाहीत आणि वाचकांचा अनुभव कमी होतो. या समस्येवर उपाय म्हणून सातत्यपूर्ण तांत्रिक प्रशिक्षण, संगणक व डिजिटल साधनांचा व्यवहारिक वापर शिकवणे आणि तज्ञ मार्गदर्शनाची व्यवस्था आवश्यक आहे. अशा पद्धतीने ग्रंथालये धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील वाचकांसाठी आधुनिक, आकर्षक आणि कार्यक्षम ज्ञानकेंद्र बनू शकतात.

**५. सामाजिक समावेशनाचा प्रश्न:** धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना समाजातील विविध घटकांशी समायोजन करणे मोठे आव्हान ठरते. विशेषतः नंदुरबार जिल्हा आदिवासीबहुल आहे, तर धुळे जिल्ह्याचे दूरवरचे खेडे ग्रामीण आणि अल्पविकसित असून आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्तरात लक्षणीय विविधता आहे. शहरातील काही वाचनालये व काही प्रमुख ठळक ग्रंथालये व्यवस्थित सेवा पुरवत असली तरी, महिला, वृद्ध, दिव्यांग आणि ग्रामीण वाचकांसाठी अनेक ग्रंथालयांमध्ये सुविधा मर्यादित आहेत. त्यामुळे सामाजिक समावेश नीट साधला जात नाही आणि या काही वयोगट व समुदाय ग्रंथालय सेवा व संसाधनांपासून वंचित राहतात. वाचनसंस्कृती, ज्ञानवितरण आणि सामाजिक सहभाग यामध्ये ही असमानता दिसून येते. प्रभावी सामाजिक समावेशासाठी स्थानिक भाषांमध्ये साहित्य उपलब्ध करून देणे, आदिवासी व ग्रामीण संस्कृतीशी संबंधित उपक्रम राबवणे, तसेच महिला, वृद्ध व दिव्यांगांसाठी प्रवेशसुविधा आणि अनुकूल सेवा प्रदान करणे आवश्यक आहे. या उपाययोजनांमुळे ग्रंथालये धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील सर्वसमावेशक ज्ञानकेंद्र म्हणून कार्यरत राहू शकतात.

**६. स्थानिक सहभागाची कमतरता:** सार्वजनिक ग्रंथालयांच्या कार्यक्षमतेवर स्थानिक समुदायाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. परंतु अनेकदा ग्रामीण व आदिवासीबहुल भागांमध्ये स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था किंवा शाळा–महाविद्यालये ग्रंथालय उपक्रमात सक्रिय सहभागी होत नाहीत. दूरवरच्या खेड्यांमध्ये लोकांच्या सहभागीतेची कमी, आर्थिक मर्यादा आणि जागरूकतेचा अभाव यामुळे ग्रंथालयातील कार्यक्रम, वाचन प्रोत्साहन मोहिमा, शैक्षणिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम प्रभावीपणे राबवता येत नाहीत. परिणामी समाजाचा काही भाग ग्रंथालय सेवा व संसाधनांपासून वंचित राहतो, वाचनसंस्कृती, सामाजिक सहभाग आणि ज्ञानवितरणावर मर्यादा येते. स्थानिक सहभाग वाढविण्यासाठी समुदायाभिमुख उपक्रम, स्वयंसेवी संलग्नता, शाळा व ग्रामपंचायतींचा समावेश व प्रचार-प्रसार यावर भर देणे आवश्यक आहे.

**(क) उपलब्ध संधी -**

**१. डिजिटल ग्रंथालयांचा विकास:** डिजिटल ग्रंथालय म्हणजे पुस्तके, जर्नल्स, संदर्भ साहित्य, संशोधन प्रबंध, प्रतिमा, ऑडिओ-व्हिडिओ अशा सर्व माहितीचा संगणकीकृत आणि ऑनलाइन स्वरूपातील संग्रह होय. सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये डिजिटल कलेक्शन उपलब्ध झाल्यास वाचकांना कोणत्याही वेळी आणि कुठूनही माहिती मिळू शकते, ज्यामुळे वाचनसंस्कृतीला आधुनिक रूप प्राप्त होते. ई-पुस्तके, ई-जर्नल्स, डिजिटल डेटाबेस (जसे NDL, eShodhSindhu), क्लाउड-आधारित संचय आणि डिजिटल आर्काइव्ह तयार केल्याने ज्ञानसंपत्ती अधिक व्यापक व सुरक्षित होते. यामुळे भौतिक पुस्तकांवरील अवलंबित्व कमी होऊन संग्रह व्यवस्थापन सुलभ

होते. डिजिटल ग्रंथालयामुळे शहरी–ग्रामीण अंतर दूर होते आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही उच्च दर्जाचे साहित्य उपलब्ध होते.

**२. समुदाय आधारित उपक्रम:** सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास केवळ शासकीय अनुदानावर अवलंबून न राहता स्थानिक समुदायाच्या सहभागातून अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकतो. वाचन प्रोत्साहन मोहिमा, परिसर स्वच्छता उपक्रम, पुस्तक दान शिबिरे, वाचक मंडळे, अभ्यास गट आणि स्थानिक कला–संस्कृती जपणारे कार्यक्रम हे सर्व समुदाय आधारित उपक्रमांतून राबवता येतात. स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, ज्येष्ठ नागरिक संघ आणि शाळा–महाविद्यालयांचा सक्रिय सहभाग मिळाल्यास ग्रंथालयाच्या कार्यात नवीन ऊर्जा निर्माण होते. अशा उपक्रमांमुळे ग्रंथालय आणि समुदाय यांच्यातील नाते अधिक घट्ट होते, तसेच लोकांमध्ये सामाजिक बांधिलकी, सहकार्याची भावना आणि वाचन संस्कृती बळकटीस येते. परिणामी ग्रंथालय हे समाजातील सर्व घटकांना जोडणारे, सतत सक्रिय आणि लोकाभिमुख ज्ञानकेंद्र म्हणून उभे राहू शकते..

**३. शैक्षणिक आणि संशोधन सहाय्य:** सार्वजनिक ग्रंथालये विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि स्पर्धा परीक्षेच्या तयारीत असलेल्या वाचकांना अत्यावश्यक शैक्षणिक आधार उपलब्ध करून देतात. संदर्भग्रंथ, संशोधन जर्नल्स, प्रबंध, शब्दकोश, विश्वकोश, सरकारी अहवाल आणि डिजिटल डेटाबेस उपलब्ध केल्यास अभ्यासकांना सखोल माहिती सहज मिळू शकते. अनेक ग्रंथालये अभ्यास कक्ष, मार्गदर्शन व्याख्याने, करिअर काउन्सिलिंग, तसेच ऑनलाइन संसाधनांची सुविधा देऊन शिक्षण प्रक्रियेला पूरक वातावरण निर्माण करतात. ग्रामीण आणि अल्पसुविधा असलेल्या भागांमध्ये ही सहाय्यकारी भूमिका अधिक महत्त्वाची ठरते, कारण अशा ठिकाणी शैक्षणिक साधनसंपत्ती मर्यादित असते. ग्रंथालये जर धोरणात्मक पद्धतीने शैक्षणिक व संशोधन संसाधने उपलब्ध करून देतात, तर ते स्थानिक समाजात ज्ञानवृद्धी, कौशल्य विकास आणि शैक्षणिक उन्नतीचे केंद्र म्हणून मोठे योगदान देऊ शकतात.

**४. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सेवा सुधारणा:** २१ व्या शतकात सार्वजनिक ग्रंथालयांच्या सेवा अधिक परिणामकारक, जलद आणि वापरकर्ताकेंद्रित बनवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर अत्यावश्यक झाला आहे. डिजिटल कॅटलॉग (OPAC), ई-पुस्तके, ई-जर्नल्स, QR-कोड आधारित पुस्तक शोध, RFID व्यवस्थापन, तसेच क्लाउडवर आधारित डिजिटल लायब्ररी यामुळे वाचकांना माहिती मिळवण्याची प्रक्रिया अधिक सोपी व सुलभ होते. इंटरनेट आणि संगणक सुविधा उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य, ऑनलाइन वर्ग, स्पर्धा परीक्षा तयारी यांसाठी मोठी मदत होते. मोबाइल ॲप, व्हॉट्सॲप सेवा, आणि ऑनलाइन कार्ड नूतनीकरणाद्वारे ग्रंथालय सेवांचा विस्तार घरबसल्या करता येतो. तंत्रज्ञानामुळे ग्रंथालये पारंपरिक स्वरूपातून आधुनिक, गतिमान आणि वापरकर्त्यांना आकर्षित करणाऱ्या ज्ञानकेंद्रात रूपांतरित होऊ शकतात.

**५. सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP):** सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासासाठी सार्वजनिक–खाजगी भागीदारी ही आजच्या काळातील एक अत्यंत प्रभावी संकल्पना ठरू शकते. सरकारी अनुदान मर्यादित असल्याने कॉर्पोरेट कंपन्या, NGO, शैक्षणिक संस्था आणि स्थानिक उद्योग समूह यांच्या सहकार्यातून ग्रंथालयांना आर्थिक, तांत्रिक व व्यवस्थापकीय मदत मिळू शकते. अनेक खाजगी संस्था CSR निधीच्या माध्यमातून संगणके, ई-लायब्ररी, इंटरनेट सुविधा, मुलांसाठी शैक्षणिक कार्यक्रम तसेच पुस्तकदान उपक्रम राबवू शकतात. अशा सहकार्यामुळे ग्रंथालयांची सुविधावाढ, तांत्रिक उन्नती, नव्या कार्यक्रमांची निर्मिती आणि व्यापक लोकसहभाग सुनिश्चित होतो. सार्वजनिक–खाजगी भागीदारीमुळे ग्रंथालये केवळ वाचनालय न राहता ज्ञान, प्रशिक्षण आणि सामाजिक विकासाची आधुनिक केंद्रे म्हणून उभी राहू शकतात.

**६. सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे केंद्र:** सार्वजनिक ग्रंथालये ही केवळ वाचनाची ठिकाणे नसून समाजाच्या सांस्कृतिक जीवनाला आकार देणारी महत्त्वाची केंद्रे आहेत. सध्या बहुतेक ग्रंथालये त्यांच्या परीने साहित्यिक कार्यक्रम, व्याख्याने, पुस्तक प्रकाशन, वाचन स्पर्धा आणि विविध सांस्कृतिक उपक्रम राबवत असतात; परंतु हे उपक्रम मर्यादित साधनसामग्रीमुळे छोट्या प्रमाणावरच राहतात. स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था, शाळा–महाविद्यालये आणि सांस्कृतिक मंडळांचा सक्रिय लोकसहभाग मिळाल्यास हे ग्रंथालय व्यापक प्रमाणावर सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे प्रभावी केंद्र बनू शकतात. अशा सहभागामुळे ग्रंथालय समाजातील विचारविनिमय, ज्ञानवृद्धी, परंपरा जपणे आणि समुदाय एकत्रित ठेवण्याचे गतिमान व्यासपीठ होऊ शकते. यामुळे ग्रंथालयाचा सामाजिक प्रभाव वाढून संपूर्ण परिसराच्या सांस्कृतिक विकासाला नवी दिशा मिळते. संगीत, नाटक, कविता वाचन, कला प्रदर्शन आणि सामाजिक चर्चेसाठी ग्रंथालये केंद्र ठरू शकतात. स्थानिक संस्कृती जपण्यासाठी आणि सामाजिक एकात्मता वाढवण्यासाठी ग्रंथालयांचा वापर करता येईल.

**निष्कर्ष** : अभ्यासातून आढळते की पश्चिम खानदेशातील सार्वजनिक ग्रंथालये २१ व्या शतकात आधुनिक तंत्रज्ञानाच्या तुलनेत मागे पडत आहेत. निधीअभावी, मनुष्यबळाचे अपुरे प्रशिक्षण, वाचकसंख्येमध्ये घट आणि तांत्रिक साधनांची कमतरता ही प्रमुख आव्हाने आहेत. परंतु योग्य धोरणात्मक योजना, डिजिटल परिवर्तन, सामाजिक सहकार्य आणि नवोन्मेषी कार्यक्रम राबवल्यास सार्वजनिक ग्रंथालयांना पुन्हा समाजातील ज्ञानकेंद्र म्हणून प्रस्थापित करता येईल. डिजिटल साधनांचा वापर वाढल्यास वाचकसंख्या आणि ग्रंथालयाचा प्रभाव दोन्ही वाढू शकतात.

**समारोप** : पश्चिम खानदेशातील सार्वजनिक ग्रंथालये ही केवळ पुस्तकांचे संग्रहालय नसून समाजातील शिक्षण, संशोधन आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे आधारस्तंभ आहेत. आधुनिक युगातील आव्हाने स्वीकारून तंत्रज्ञानाशी मैत्री केल्यास ही ग्रंथालये नवीन पिढीसाठी प्रेरणास्थान बनू शकतात. ग्रंथालय विकास हा फक्त शासनाचा नव्हे तर समाजाच्या सहभागाचा एक व्यापक उपक्रम आहे.

**संदर्भ साधने :**

१.. वाचनसंस्कृतीचा ठेवा: राजवाडे, गरुड वाचनालय (२०१९, एप्रिल २८). जळगाव: दैनिक लोकमत.

२. सरोदे, पितांबर (२००४). खानेदशातील ग्रंथालय चळवळ. धुळे: वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था.

३. साळुंखे, गोपाल (२०१७-१८). मार्च शब्दांची वारी. गरुड भरारी, यथार्थ डिजीटल ई साप्तिक.

४. पश्चिम खानदेशातील निवडक सार्वजनिक ग्रंथालयाच्या अध्यक्ष व ग्रंथपालांच्या मुलाखती

५. ग्रंथालय कर्मचारी वेतानाभावी आर्थिक अडचणीत, उपासमारीची वेळ, (२०२५, मार्च२८) पुणे : दैनिक पुण्य मराठी